**<u>प्रतिवादी क्र. १, २-अ, २-ब, ३, ४, ११ व १२ तर्फे उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.</u>**

५. मी कधीही ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये उभा राहिलो नव्हतो. आमच्या गावामध्ये केसरकर व सुतार असे दोन राजकीय गट आहेत. प्रतिवादी हे केसरकर गटाचे कार्यकर्ते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सुतार गटाचे काम करतो. किणे गावामध्ये माझी गट क्र. ४३१ मध्ये ०.७२ आर जमीन आहे.

६. किणे गावाच्या पुर्वेस पोश्रातवाडी नावाचे गाव आहे. माझे गट क्र. ४३१ मधून रस्ता मिळू नये याबाबत प्रतिवादी क्र. ३ व इतर लोकांच्या विरोधात दिवाणी प्रकरण चालू आहे. त्याबाबतचा वाद २००९ सालापासून चालू असून मा. उच्च न्यायालया पर्यंत गेलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ ने माझ्या विरोधात रस्त्याबाबत महसूल कार्यालयात आणि मा. उच्च न्यायालयाकडे अर्ज केलेले आहेत. आमच्या गावात प्रतिवादी क्र. ३ च्या नावाप्रमाणे इतर व्यक्ती नाही.

७. संजय सुबराव गुडूळकर माझा पुतण्या आहे. मी व माझा पुतण्या गट क्र. ४३१ मधील रस्त्याबाबतचे प्रकरण एकत्रीतपणे पाहतो. माझ्या पुतण्याने रस्त्याच्या वादाबाबत प्रतिवादी क्र. ३ व इतरांच्या विरोधात फौजदारी तक्रार दाखल केलेली आहे.

८. माझे तिसरी पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. मला हा दावा कधीपासून चालू आहे याबाबत माहिती नाही. मला या दाव्यातील सर्व वादी व प्रतिवादींची नावे माहिती नाहीत. वादीने हा दावा कमळाबाईच्या विरोधात दाखल केलेला आहे. वादी जयजयरामला बोलता येते, तो हिंडू-फिरु शकत नाही. मला या प्रकरणात साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स आलेले नाही. मला जयजयरामने साक्ष दयायची आहे असे सांगितल्यामुळे मी आलेलो आहे. वादीने हा दावा वाटून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

९. माझी व वादीची वीस वर्षापेक्षा जास्त काळापासून ओळख आहे. मी वादी व प्रतिवादींच्या घरी येत-जात असतो. मी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वादामध्ये कधीही मध्यस्थी केली नाही.

१०. मला दावा मिळकतीतील गटांचे एकूण क्षेत्र सांगता येणार नाही. मला दावा

मिळकतीच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाही. माझी दावा मिळकतीतील गट क्र. ३४४ व्यतिरिक्त इतर मिळकतींना लागून जमीन नाही. माझे वादीच्या परिवारासोबत नातेसंबंध नाहीत. वादी व प्रतिवादांच्या परिवाराचा मूळ पुरुष दाजी होता. मी त्याला पाहिलेले असून तो कधी मयत झाला याबाबत मला माहिती नाही. मला दाजीकडे किणे गावामध्ये एकूण किती घरे व जमिनी होत्या याबाबत माहिती नाही.

११. मला सध्या किणे गावामध्ये वादी व प्रतिवादींची किती घरे आहेत याबाबत माहिती नाही. मला वादीला आणखीन तीन भाऊ असल्याबाबत माहिती आहे. सध्या जयजयराम जुन्या घरामध्ये राहत आहे. रामा देखील त्याच जुन्या घराच्या बाजूला राहतो. मला हरी सध्या कोठे राहतो याबाबत माहिती नाही. सध्या मयत कृष्णाची मुले त्यांनी नव्या बांधलेल्या घरामध्ये राहत आहेत. मला जयजयराम व त्याचे भाऊ कधीपासून वेगवेगळे राहत आहेत याची माहिती नाही.

१२. मला वादीने गट क्र. ३३० मधील काही जमीन मारुती परसू तुप्पट याला विकल्याबाबत माहिती नाही. मला प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी याच गटातील काही जमीन कुंभार यांना विकल्याचे माहिती नाही. सध्या वादीच्या ताब्यात कोणतीही शेती नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या ताब्यात काही जमीन आहे. मला त्यांच्या ताब्यात निश्चित किती जमीन आहे हे सांगता येणार नाही. हरी पाटील व रामा पाटील यांच्या कुटुंबाच्या ताब्यातदेखील कोणतीही जमीन नाही.

१३. मला प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या ताब्यात गट क्र. ३४४ मधील किती जमीन आहे याबाबत माहिती नाही. गट क्र. ३४४ मधील विहिरीवरती कृष्णा पाटील याच्या नावे वीज जोडणी घेण्यात आलेली होती. मला गट क्र. ३४४ च्या जवळील गट क्र. ३२१ मधील जमीन वादी व प्रतिवादींच्या ताब्यात कुळाने असल्याबाबत माहिती नाही. गट क्र. ३४४ मध्ये दोन बोअरवेल आहेत. गट क्र. ३४४ मधील जमिनीला 'कामतशेत' असे नाव आहे. मला या जमिनीच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाहीत.

१४. गट क्र. ३४४ च्या पुर्वेला ओढा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गटाच्या दक्षिणेला किणे-पोश्रातवाडी रस्ता आहे. मला गट क्र. ३४४ ला लागून विठोबा नागोजी पाटील व मारुती तुकाराम पाटील यांच्या जमिनी असल्याबाबत माहिती नाही. मला गट क्र. ३४४ मधील विहिरीच्या चारही बाजूंना कोणाच्या जमिनी आहेत याबाबत सांगता येणार नाही. कृष्णाच्या मृत्यूनंतर त्याचे गट क्र. ३४४ मधील विहिरीचे वीजबिल जयजयराम, हरी, रामा आणि कृष्णाचे वारस मिळून भरतात. मी ते सर्व एकत्रीत बिल भरत असल्याचा कागदी पुरावा पाहिलेला नाही.

**१५**. गट क्र. ३४४ मध्ये एक शेतघर आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते घर कृष्णाने बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी व प्रतिवादींची दावा मिळकत सामाईक मालकीची असल्याचे काल्पनिक सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला गट क्र. ३४४ मधील विहिरीचे पाणी घेण्यास प्रतिवादी अडथळा करीत असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वादीसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला मदत करुन प्रतिवादीला त्रास देण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पुर्ण.**

**फेरतपासणी नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAVI PANDURANG THORE
Date: 2024.06.13 17:30:32 +0530

(आर. पी. थोरे)

दिनांक – १३.०६.२०२४.                    सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.